महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/प्रथमसत्र २०२५-२६/पाच/1299 दिनांक:- 4 DEC 2025

वाचावे : १) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं-२०२५/सात/मुलभूत अभ्यासक्रम/७२८, दिनांक ३०.०७.२०२५

## परिपत्रक

**विषय : शासकीय उच्चकला परीक्षा- प्रथम सत्र (शैक्षणिक वर्ष २०२५-२६)**
**मुलभूत (Foundation) अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्राच्या प्रथम सत्र परीक्षेत एका विषयात सूट देणेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये किंवा तत्पूर्वी मुलभूत (Foundation) अभ्यासक्रम (Yearly Pattern) उत्तीर्ण झालेल्या व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सुधारित ३ वर्षांच्या खालील नमूद पदविका अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षास (Semester Pattern) दहावीच्या गुणांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना खालील एका विषयात सूट देण्याबाबत दिनांक २९.०७.२०२५ रोजीच्या नियामक परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विषय संकेतांक | विषय | क्रेडीट |
|---|---|---|---|---|
| १ | रेखा व रंगकला पदविका | 250214 | History of Indian Art | ०४ |
| २ | उपयोजित कला पदविका | 250312 | Design and Colour Fundamental | ०५ |
| ३ | शिल्पकला व प्रतिमानबंध पदविका | 250414 | History of Indian Art (Part-1) | ०५ |
| ४ | वस्त्रकला पदविका (प्रिटींग व विव्हींग) | 251013 | Design Fundamental | ०६ |

०२. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वरील अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या व मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांचे उक्त विषयात सूट मिळण्याकरिता कला परिसंस्थेस प्राप्त झालेले अर्ज प्राचार्यांच्या शिफारशींसह सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ यांचेकडे दिनांक १४.०८.०२०२५ पर्यंत पाठविण्याबाबत उपरोक्त संदर्भिय दिनांक ३०.०७.२०२५५ रोजीच्या पत्रान्वये सर्व कला परिसंस्थांना कळविण्यात आले आहे.

०३. त्यानुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वरील अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या व मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी उक्त विषयात सूट मिळण्याकरिता अर्ज सादर केले असतील तर अशा विद्यार्थ्यांना प्रथम सत्र परीक्षेतील वरील विषयाच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्याची आवश्यकता नाही. तथापि, संबंधित विद्यार्थी मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण आहे किंवा कसे याबाबत कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी खात्री करुन या प्रकरणी निर्णय घ्यावा.

तसेच उक्त विषयात सूट मिळण्याकरिता कला परिसंस्थेने यापूर्वी प्रस्ताव पाठविले असले तरी प्रस्तुत प्रकरणी मंडळ स्तरावर तात्काळ कार्यवाही करावयाची असल्याने कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी कला परिसंस्थेस प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज आपल्या शिफारशींसह व संबंधित विद्यार्थ्यांच्या मुलभूत अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकांच्या प्रतींसह मंडळाच्या director.msbae@gmail.com या ई-मेलवर तात्काळ पाठविण्यात यावे. जेणेकरुन प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची मंडळ स्तरावर तपासणी करुन मंजूरीची कार्यवाही तात्काळ करता येईल.

०४. प्रस्तुत परिपत्रक कला शिक्षण मंडळाच्या https://msbae.ac.in या संकेतस्थळावरील Circular या टॅबमध्ये तसेच उच्चकला परीक्षेच्या https://hae.semesterpattern.msbae.in/ या लिंकवर Notifications या टॅबमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, संलग्नित शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था.

प्रत,

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर/छत्रपती संभाजीनगर
४) निवड नस्ती.